

# घंड्या

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा०वा०
दा. क्र. १००९५



वि. वि. भागवत

हा.क्र.१००९५ / सन-१९६२.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

अ. वि. गृह प्रकाशन, पुणें २.

प्रकाशक :

दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
अ. वि. गृह प्रकाशनासाठीं,
१७८६ सदाशिव पेठ, पुणें २.

आवृत्ति १ ली.
कार्तिक शु. १, शके १८८४.
+७८
१९६२

सर्व हक्क प्रकाशकाधीन.

मुद्रक :

दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
लोकसंग्रह छापखाना,
१७८६ सदाशिव पेठ, पुणें २.

38023
प्रा.वा.
3022
10/11/62

# प्रास्ताविक

प्राथमिक शाळांतून व माध्यमिक शाळांतून मुलें वर्गाचे दोन भाग पाडून सामुदायिक रीतीनें भेंड्यांची चढाओढ लावतात. त्यावेळीं ज्याचें पाठांतर चांगलें व विपुल तो पक्ष यशस्वी होतो व एखादा विद्यार्थी आपल्या पाठांतरानें आपल्या पक्षाची बाजू राखून सर्वांचे धन्यवाद मिळवितो.

यासाठीं बाराखडीच्या प्रत्येक अक्षरानें आरंभ होणाऱ्या कविता पाठ असाव्या लागतात. अशा प्रत्येक अक्षराची एक या-प्रमाणें सुमारे ४५–४६ कवितांचा छोटासा संग्रह येथें केला आहे.

त्यांत मीं एक विशिष्ट दृष्टि स्वीकारली आहे. या संग्रहांत प्राचीन व अर्वाचीन कवींच्या कविता मीं एकत्र करण्याचा प्रयत्न केला आहे. वृत्तांत जुन्या पद्धतीच्या अक्षरगणवृत्तांची निवड प्रामुख्यानें हेतुपूर्वक केली आहे. कविता–त्यांतील रस, भाषा, अर्थ, अलंकार यांचा विचार करून निवडल्या असून त्यांचा अर्थहि खालीं दिला आहे. अशा रीतीनें भेंड्या खेळण्यास व मुलांचें पाठांतर वाढण्यास या संग्रहाचा उपयोग झाल्यास या प्रयत्नाचें चीज होईल.

याच्या पाठांतरानें मुलांच्या मनावरहि सहजपणेंच सुसंस्कार घडावेत असाहि एक हेतु आहे.

‘चिंतामणी’
चाळीसगांव (जळगांव)

वि. वि. भागवत

# भेंड्यांचा सहकारी कविवर्ग

## अनुक्रम


श्री ना. धों. खांडेकर.
अ लक्ष्मणशास्त्री लेले.
आ सौ. विजया जोशी.
इ माधव जूलियन.
ई राजा सर टी माधवराव.
उ भा. रा. तांबे.
ऊ वि. वि. भागवत.
ए कृष्णशास्त्री.
ऐ कृष्णशास्त्री.
ओ मो. ग. लोंढे.
औ मो. ग. लोंढे.
अं स्वातंत्र्यशाहीर गोविंद-
क भा. रा. तांबे.
ख चंद्रशेखर.
ग लक्ष्मणशास्त्री लेले.
घ भा. रा. तांबे.
च कृ. ना. आठल्ये.
छ म. मो. कुंटे.
ज शांता शेळके.
झ शि. रा. निजसुरे.
ट गो. वा. कानेटकर.
ठ वि. वि. भागवत.
ड सेनापति बापट.
ढ सौ. आनंदीबाई लेले.
ण वि. वि. भागवत.
त परशुरामपंत गोडबोले.
थ बा. भ. बोरकर.
द गणेशशास्त्री लेले.
ध स्वा. वीर सावरकर.
न वामनपंडित.
प राजा सर टी माधवराव.
फ आचार्य अत्रे.
ब मोरोपंत.
भ कृ. ना. आठल्ये.
म साने गुरुजी.
य स्वातंत्र्यशाहीर गोविंद.
र गोविंदाग्रज.
ल कुसुमाग्रज.
व बालकवि ठोमरे.
श पांडुरंगशास्त्री पारखी.
ष राजा सर टी.माधवराव.
स आचार्य विनोबा.
ह वि. स. खांडेकर.
ळ वि. वि. भागवत.
क्ष रे. ना. वा. टिळक.
ज्ञ वि. वि. भागवत.


सर्व कविवर्यांचे मनःपूर्वक आभार.

३८०८३
भा.वा.
३०२९
९०।७२।५२

# भेंड्या

वसंततिलका

श्रीरामचंद्र-पद-कंज-नखप्रभा ती
निःश्रेयसार्थ मनि मी स्मरतों प्रभातीं
जी चिंतितांचि हरि अंतरिच्या तमाला,
ध्याती जिला म्हणुनि संतत संतमाला.

ना. धों. खांडेकर

श्रीरामचंद्राच्या पायाच्या नखाची प्रभा मी मुक्त होण्या-साठीं पहांटें मनामध्यें स्मरतों. त्या तेजस्वितेचें चिंतन केल्यानें मनांतील अंधार नाहींसा होतो व तिला सर्व संत सज्जन नेहमींच ध्यात असतात.

वसंततिलका

अत्यंत थोर जन दारुण संकटांत
औदार्य वैभव अपूर्वचि दावितात
अग्नींत कृष्ण अगरू पडतां, विलोकीं
लोकोत्तर प्रकटि तो निजगंध लोकीं.

लक्ष्मणशास्त्री लेले

जे खरे महात्मे असतात ते भयंकर आपत्तींतहि आपलें असामान्य औदार्य दाखवितात. उदाहरणार्थ, काळें चंदन आगींत पडलें तर तें आपला मधुर सुगंध प्रकट करून सर्व वातावरण सुगंधित करून सोडतें.

शार्दूलविक्रीडित

**आहे जीवन हा प्रवास–वरुनी वर्षे कधीं मेघ तो**
**तापे सूर्य कधीं, हिमांशु वरुनी केव्हां सुधा वर्षतो.**
**कोठें रम्य वनस्थली सुखविते, कोठें मरूभूमित––**
**जाई मार्ग–तदा सदा वधुवरा! तुम्हीं रहा सस्मित.**

सौ. विजया जोशी

वधूवरांनो! वैवाहिक जीवन हा एक प्रवास आहे. त्या प्रवासांत कधीं पावसाच्या सरींमधून जावें लागेल. कधीं भर उन्हांतून, तर कधीं अमृताचा वर्षाव करणाऱ्या चंद्रप्रकाशांतून जावें लागेल. कधीं प्रवासाचा मार्ग रमणीय अशा वनांतून जाईल; तर कधीं ओसाड वाळवंट तुडवीत जाणें भाग पडेल. पण कोणत्याहि परिस्थितींत तुम्ही नेहमींच हंसतमुख रहा.

गज्जल किंवा रसना

**इच्छितां स्वातंत्र्य, द्या स्वातंत्र्य अन्याला तुम्ही**
**दाखवा ही रुस्तुमी.**
**कां गुलामांचें तुम्हां सुल्तान होणें आवडे?**
**भ्रान्त तुम्हां कां पडे?**

माधव जूलियन

तुम्ही स्वतंत्र राहाण्याची लालसा बाळगतां. दुसऱ्यांनाहि तुम्हीं स्वातंत्र्य दिलें पाहिजे. एवढें औदार्य व धाडस तुम्हीं दाखवा. तुम्हांला गुलामांचे राजे किंवा धनी होणें कां आवडतें तें समजत नाहीं. अशी भूल तुम्हांला कां पडावी?

आर्या

**ईश्वरनियम असा कीं, समस्त सुखदुःख मिश्र भोगावें.**
**निर्दोष सौख्य नाहीं, सुखांशवृद्धि प्रयत्न योजावे.**

राजा सर टी. माधवराव

परमेश्वराचा नियम असा आहे कीं, तुम्हांस सुखाबरोबर दुःख भोगलें पाहिजे. केवळ सुखच कुणाच्याहि वांट्यास येत नाहीं. आपलें सुख वाढविण्यासाठी प्रत्येकानें योजनापूर्वक यत्न करावा.

द्रुतविलंबित

**उटज बांधुनियां तटिं तापसी**
**सुतप आचरिती सुखि मानसीं.**
**सतत चिंतन ते करिती इथें**
**कितिक सेविति ते सुखशांतितें !**

भा. रा. तांबे

निर्झराच्या कांठाशीं झोंपडी बांधून मनांत सुखी असलेले तपस्वी उग्र तपश्चर्या करतात. या रम्य स्थानीं ते सतत परमेश्वराचें चिंतन करतात. त्यामुळें त्यांना अमर्याद सुख व शांति लाभते.

कामदा

**'ऊठ अर्जुना, मोह आवरी'**
**श्रीहरी वदे, 'शस्त्र घे करीं.**
**साम्यबुद्धिनें सिद्ध हो रणीं**
**पाप ना तुला मरणमारणीं' !**

वि. वि. भागवत

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, 'अर्जुना, ऊठ. मोह बाजूला कर. हातांत शस्त्र घे. लाभ हानीविषयीं चित्त सम ठेवून तूं युद्ध केल्यास तुला मरणाचें व मारण्याचें पाप लागणार नाहीं.

वसंततिलका

**एथें समस्त बहिरे बसतात लोक**
**कां भाषणें मधुर तूं करिशी अनेक?**
**हे मूर्ख त्यांस किमपीहि नसे विवेक**
**रंगावरून तुजला गणितील काक!**

कृष्णशास्त्री चिपळूणकर

या ठिकाणीं सर्व बहिरे आहेत. तूं आपलीं गोड भाषणें येथें कशाला करतोस? येथें जमलेल्या मूर्ख लोकांना कसलाहि विचार नाहीं. तुझ्या रंगावरून ते तुला कावळा समजतील व तुझी अवहेलना करतील!

आर्या

**ऐश्वर्य, बल, धनादिक सौख्यें प्रसवे समस्त जी कांहीं**
**ती विद्या जो देई, तेणें वद, काय तें दिलें नाहीं?**

कृष्णशास्त्री चिपळूणकर

जी विद्या वैभव, संपत्ति, सामर्थ्य वगैरे सुखें देते व ती विद्या जो गुरु देतो त्यानें आपल्याला दिलें नाहीं असें काय आहे?

इंद्रवज्रा

**ओसाड जागेंत जरी शिरेन**
**सुपीक तीतें तरि मी करीन;**
**फुलें फळेंहि दिसतील तेथें**
**येईल कीं वैभव त्या स्थळातें.**

मोरो गणेश लोंढे

ओढा म्हणतो, 'मी ओसाड जागेंत जर प्रवेश केला तर ती जमीन मी सुपीक करीन. ती जागा फुलांच्या सुगंधानें व फळांच्या योगानें रम्य होईल. त्या स्थळाला एकप्रकारचें वैभव प्राप्त होईल.

वसंततिलका

औतांप्रती धरुनियां अपुल्या करांत
बाप्ये स्त्रिया जरठही बहु राबतात;
हीं बालकेंहि मधुनी करिती श्रमाला,
कामाविणें न सुचतें दुसरें तयांला.

मोरो गणेश लोंढे

हंगामाच्या दिवसांतील शेतकऱ्यांची गर्दी या कवितेंत वर्णन केली आहे. नांगरादि आवश्यक साधनें घेऊन प्रौढ स्त्रिया व वृद्ध लोकहि शेतांत राबत असतात. तशींच छोटीं मुलेंहि त्यांना मदत करतात. त्यांना कामाशिवाय दुसरें सुचत नाहीं.

साकी

अंधारानें अधिक पेटती, सूर्यानें जे विझती,
ते ताऱ्यांचे दीप पेटवुनि ठेवा गगनावरती !

कवि गोविंद

श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवाची आरास कशी करावयाची ? आकाशांत ताऱ्यांचे दिवे लावा. तारे अंधारांत अधिक तेजस्वी दिसतात व सूर्याच्या येण्यानें ते विझतात.

द्रुतविलंबित

कनकगोल रवी उदयाचलीं
सहज नाशित येइ तमावली ;
तरुंतुनी कर घालुनि तो बळी
बहु सुवर्णसुमें उधळी जळीं !

भा. रा. तांबे

पूर्वदिशेला उगवणारा सूर्य सोन्याच्या गोळचासारखा दिसतो. तो अंधकाराचा नाश सहज करतो. तो आपले किरणरूपी हात झाडांच्या फांद्यांतून घालतो. तो संपन्न असल्यामुळें सोन्याचीं फुलें पाण्यांत उधळतो.

पृथ्वी

**खळीं, तव जिराइतें, तव समृद्ध बागाइतें,**
**जयामधुनि धांवती उदकपाट सैराट ते,**
**सुमंगल मनोहरा डुलति दाट आम्रावली,**
**विशाल वट ते तुझे, सुखद सर्वदा सांवली.**

चंद्रशेखर

आपल्या भारतमातेला वंदन करतांना कवि चंद्रशेखर म्हणतात 'तुझ्या जिराईत जमिनी, त्यांत असलेलीं खळीं, ज्यांच्या-मधून छोटे पाण्याचे पाट वेगानें धांवत आहेत अशा बागाईत सुपीक जमिनी यांचें वर्णन किती करावें ? त्या शेतांतून मनाला आनंद देणाऱ्या व मंगलदायक आंबराया डोलत आहेत. तुझ्या प्रदेशांत भव्य वटवृक्ष आहेत व त्यांची सुखदायक सावली सर्वत्र पसरलेली दिसते.'

मालिनी

**गळुनि पडति वेली खालतीं, म्लान होती,**
**तरुवर वणव्यानें दग्ध होऊन जाती;**
**वितरिशि जलधारा शैलशृंगीं अहाहा,**
**विभवमद तुझा हा केवढा अंबुवाहा !**

लक्ष्मणशास्त्री लेले

उन्हामुळें वेली मलूल होऊन खालीं पडल्या आहेत; वणव्या-मुळें मोठमोठे वृक्ष जळून खाक होत आहेत; अशा वेळीं गर्वानें अंध झालेल्या मेघा, तूं काय करतोस? तुझ्या जलधारांचा वर्षाव पर्वताच्या शिखरावर करतोस. अरेरे! मदांध मेघा! तुझ्या संपत्तीचा ताठा किती विपरीत कृति करीत आहे!

द्रुतविलंबित

**घन पिता मम जो नटवी धरा,**
**मम असे जननी गिरि-कन्दरा;**
**जननिचे शरिरीं बहु नाचतों,**
**खदखदा हंसतों अणि खेळतों.**

भा. रा. तांबे

निर्झर म्हणतो, ‘जो मेघ (आपल्या जलवर्षावानें) पृथ्वीला (हिरव्या तृणांनीं) नटवतो तो माझा पिता आहे. डोंगराची दरी ही माझी आई आहे. मी आईच्या शरीरावर खूप नाचतों; मी खदखदां हंसतों व खेळतों.

शार्दूलविक्रीडित

**“चक्राकार धरा फरा, बहु बरा, शत्रू करा घाबरा**
**शौर्या दावुनि कांपवा थरथरा, तोफा भरारा भरा.**
**म्लेंछांमाजि शिराच घेउनि सुरा, कापा चरारा शिरां**
**धारातीर्थहि लाधतां पतकरा, मागें न कोणी फिरा!”**

कृष्णाजी नारायण आठल्ये

अटकेपार मराठी झेंडे फडकविणारा राघोबादादा आपल्या सैन्यास मोहिमेच्या आघाडीवर कूच करतांना पुढील संदेश देत आहे:—

"सैन्याची रचना चक्राच्या आकाराची करा. शत्रूला घाब-रवून सोडा. भीम पराक्रम करून त्याच्या हृदयांत भीतीचा थरकांप उडवून द्या. तोफा भराभर भरा. तरवारी घेऊन शत्रूच्या सैन्यांत शिरा आणि शत्रु-सैनिकांचीं शिरें उडवा. 'मरेन किंवा मारीन' अशा निश्चयानें वागा. धारातीर्थीं मरण पत्करा. भागूबाईसारखे पळून येऊं नका."

**द्रुतविलंबित**

**छबकडा चिमणा करितो गुण**
**चिमुकलें धरलें मग रंगण**
**दुडदुडां पळतां पळतां पडे**
**गडबडे रडतां मुख बापुडें.**

महादेव मोरेश्वर कुंटे

कवीनें संभाजीची लहानपणची क्रीडा वर्णन केली आहे. छोटा संभाजी काठीचा घोडा करून रंगणांत गोल फिरत आहे. दुडदुडा पळतां पळतां तो पडला. त्याची गडबड उडाली. त्याचा चेहरा रडतांना केंविलवाणा झाला.

**जाति–भूपति-वैभव**

**जणुं गालिचेच हे अंथरले भूवरतीं**
**जडविले जयांवर दंवबिंदूंचे मोती**
**या शाद्वलांगणीं वाटे लोळण घ्यावी**
**अन् सस्यश्यामला भूमी ही चुंबावी !**

शांता शेळके

पावसाळ्याच्या प्रारंभीं हिरव्यागार गवतानें जमीन आच्छा-दून जाते. कवयित्री त्या हिरवळीला पाहून म्हणते :–

'परमेश्वरानें हे हिरवेगार गालिचेच भूमीवर अंथरले आहेत. त्याच्यावर दंवाच्या थेंबाचे मोती जडविले आहेत. या हिरव्यागार अंगणांत मजेनें व मोकळेपणानें लोळावें असें वाटतें. आणि या पिकांमुळें किंचित् सांवळया दिसणाऱ्या भू-मातेचें चुंबन घ्यावें अशी इच्छा होते.'

द्रुतविलंबित

**झडकरी करिं वस्त्रहि आंवरी**
**पदर सावरिते वरचेवरी**
**सुतनु धाकलि, धाकलि मानसीं**
**चपल ते पळते हरिणी जशी.**

शिवराम रामकृष्ण निजसुरे

गांवाला आग लागल्यानें एका तरुण स्त्रीची धांदल कशी झाली, हें या कवितेंत वर्णन केलें आहे. ती तरुणी हातानें आपलें लुगडें सांवरीत होती. वरचेवर पदर आवरीत होती. ती लहान वयाची युवती मनांत घाबरली होती व वणव्यांत सांपडल्यावर जीवासाठी पळणाऱ्या हरिणीच्या चपलतेनें ती लगबगा पळत होती.

पृथ्वी

**टपे बक नदीतटीं टिपुनि मत्स्य भक्षावया,**
**तृणांत अथवा जसा भुजग दुष्ट दंशावया;**
**गिळी सकळ विश्व जो, लव न ज्या दया तृप्ति वा,**
**गिळी अधम काळ तो—नवल काय या मानवां ?**

गोविंद वासुदेव कानेटकर

नदी-किनाऱ्यावर मासा धरण्यासाठीं बगळा टपलेला असतो, दुष्ट सर्प धक्का लावील त्यास चावण्यासाठीं गवतांत लपलेला

असतो. ज्याला मुळींच दया व समाधान नाहीं व जो सर्व जगालाच गिळण्यास तयार आहे असा दुष्ट मृत्यु किंवा विनाश मानवाला मारून टाकील यांत आश्चर्य तें काय आहे ? म्हणून मनुष्यानें सदाच मृत्यूच्या हांकेला ओ देण्यास तयार असलें पहिजे.

द्रुतविलंबित

**ठक अरी, परि दावुनि चातुरी**
**शिवप्रभू रिपुगर्व तदा हरी**
**हरि जसा हरितो यमुनातिरीं**
**भुजगजीवित, नाचुनियां शिरीं !**

वि. वि. भागवत

ज्याप्रमाणें पूर्वी श्रीकृष्णानें यमुनेच्या तीरावर कालिया सर्पाच्या डोक्यावर नाचून त्याचा प्राण हरण केला होता, त्या प्रमाणें शत्रु अत्यंत कपटी असतांना अत्यंत बुद्धिमत्ता दाखवून श्रीशिवप्रभूंनीं त्याचा गर्व हरण केला.

द्रुतविलंबित

**डर नको मरणीं खलमारणीं**
**खलवधार्थक मायिक कारणीं.**
**मल अहंकृति स्वार्थपरा मती**
**त्यजुनि सर्वहितार्थ करी कृती**

सेनापति पां. म. बापट

मनुष्यानें मृत्यूचें भय बाळगूं नये. दुष्टाला ठार मारण्यांत पाप होतें अशी भीति नको. अधमाला ठार मारण्याचीं जीं कारणें पापरूप वाटतात तीं मायारूप आहेत. भ्रामक आहेत. स्वार्थानें लडवडलेली व गर्वानें पछाडलेली बुद्धि मलीन असते. ती टाकून सर्वांच्या हितासाठीं मनुष्यानें काम करावें.

शिखरिणी

**ढळे स्वर्गाहूनी सकल-जन-शोकापहरणा**
**शिवें केली तूतें निजशिरिं तदा बद्धचरणा**
**अगे निर्लोभ्याच्या उपजविसि लोभास मतिला**
**गुणांच्या ठायीं हा तव जननि दोष प्रगटला !**

सौ. आनंदीबाई लेले

हे गंगामाते, सर्व लोकांच्या दुःखाचा परिहार करण्यासाठीं तूं स्वर्गांतून खालीं उतरलीस; परंतु श्रीशंकरानें तुला आपल्या जटेमध्यें बंदिवान केलें. शंकरासारख्या निर्लोभ वृत्तीच्या देवामध्यें तूं लोभ निर्माण केलास. अनेक गुणांचें भांडार असलेल्या तुझ्यामध्यें हा दोषच नाहीं काय ?

आर्या

**'ण' हें शेवटिं ज्याच्या 'व' मध्यें 'रा' तसाच पहिल्यानें**
**वधिलें तयास ज्यानें नमितों त्याला प्रसन्न चित्तानें**

वि. वि. भागवत

ज्या शद्वाच्या शेवटीं 'ण' हें अक्षर, 'व' मधलें अक्षर व 'रा' पहिलें अक्षर आहे, अशा रावणाला ज्यानें मारिलें त्या रामरायाला मी आनंदित मनानें नमस्कार करतों.

मालिनी

**तरुवर सुफलांच्या आगमीं नम्र होती,**
**जलदहि जलभारें खालतीं फार येती,**
**सुपुरुष विनयातें भाग्यशाली धरीती,**
**उपकृति करित्यांची जाणिजे हीच रीती.**

परशुरामपंत गोडबोले

वा. वा. 3022 10/12/64

फळें येण्याच्या वेळीं मोठमोठे वृक्ष त्यांच्या भारानें नम्रतेनें खालीं वांकतात. पाण्यानें ओथंबलेले मेघ खूप खालीं येतात. भाग्यवान सज्जन लोक विनयशीलतेनें वागतात. सर्व उपकारी लोकांची हीच पद्धत असते. ते गर्विष्ठ नसतात.

पादाकुलक

**थकतां माथा असाच दे मज**
**माय कुशीसम तुझा किनारा**
**नश्वर नेत्रापुढें असूं दे**
**ईश्वरतेचा सदा पसारा**

बा. भ. बोरकर

मी विचार करून करून थकल्यावर माझें डोकें टेकण्या-साठीं आईप्रमाणें तुझा किनारा मला दे आणि माझ्या नाशवंत डोळ्यासमोर ईश्वराच्या अलौकिक कृतीचा पसारा सतत असूं दे.

भुजंगप्रयात

**'दयेनें जरी अर्पिसी हा स्वकाय,**
**तरी एकली मात्र वांचेल गाय;**
**तुझ्या वांचण्यानें प्रजापालनाचें**
**महत्कार्य साधेल साऱ्या जगाचें!'**

गणेशशास्त्री लेले

रघुवंशांत नंदिनीचें रक्षण दिलीप राजा करीत असतां तिला सिंहानें अडविलें असा भाग आहे. त्यावेळीं सिंहाला गायीऐवजीं आपला देह देण्यास दिलीप तयार होतो. त्यावेळीं सिंह खालील युक्तिवाद करतो. "तूं गायीच्याबद्दल तुझा बळी दिल्यानें एकटी गाय वांचेल; पण तुझ्या जिवंत राहण्यानें प्रजेचें संरक्षण होऊन साऱ्या जगाचें मोठेंच कार्य साधेल! म्हणून तूं स्वत:चें बलिदान करण्यानें नुकसानच अधिक होईल.

वसंततिलका.

**'धर्मार्थ देह वदलों, ठरलें नितांत**
**ते बोल फोल नच बालिश बायकांत**
**ना भंगली भिवुनियां धृति यातनांना**
**निष्काम-कर्मरति योगहि खंडिला ना'**

बॅ. वि. दा. सावरकर

'हें शरीर मातृभूमीच्या स्वातंत्र्यार्थ कर्तव्य करण्यासाठीं आहे' असें आम्ही बोललों. तसा आमचा निश्चय झाला होता. आमचे ते शब्द बायकांतली बालिश बडबड नव्हती. आमचें धैर्य यातनांमुळें भंग पावलें नाहीं. त्याचप्रमाणें फलाची आशा न धरतां काम करण्याचा कर्मयोगी मार्गहि आम्ही सोडला नाहीं.

मदिरा (हेमकला)

**नम्रपणेंच सभेंत महोन्नत, जे गुण वर्णुनियां परवयांचे**
**सांगितल्याविण दाविति कौशल, सर्वजनांप्रति जे स्वगुणांचें**
**स्वार्थ परार्थहि साधिति, जिंकिति शांतिबळें मुखरत्व खलांचें**
**संत महागुण-भाजन यापरि, सेवन कोण करी न तयांचें ?**

वामन पंडित

जे थोर लोक सभेमध्यें इतरांचे सद्गुण नम्रपणें सांगतात ते आपल्या गुणांची प्रतीति सर्व लोकांना दाखविण्याचें चातुर्य दाखवितात यांत शंका नाहीं. आपल्या मूकपणानें ते स्वार्थ व दुसऱ्याचें हितहि साधतात. अशा प्रकारें ते दुष्टांच्या निंदेलाहि आळा घालतात. याप्रमाणें सज्जन लोक वरील थोर सद्गुणांचें आश्रयस्थान असतात. त्यांची सेवा कोण करणार नाहीं ?

आर्या

**परिमल फुलास साजे, भूषण नारीस, धैर्य वीरास**
**सचिवास दीर्घदर्शन, सख्यास ममता, क्षमाहि राजास**

राजा सर टी. माधवराव

फूल सुवासानें, स्त्री दागिन्यानें, वीर धैर्यानें, मंत्री दूरदर्शीपणानें, मित्र प्रेमानें व राजा क्षमेनें शोभतो.

मालिनी

**फड फड फड पंखा हालवी ती तराया**
**तडफड बहु केली जाहले कष्ट वाया**
**मिटवुनि इवलेसे पाय ती शांत झाली**
**अहह, तडक आणी खालतीं खोल गेली !**

आचार्य अत्रे

केशवकुमारांचें चहाच्या पेल्यांत पडलेल्या माशीचें हें विनोदी वर्णन या कवितेंत पहा. त्या माशीनें चहांत तरंगण्यासाठीं फडफड केली. पण ती तडफड वाया गेली. आपले पाय मिटून ती शांत झाली व दुर्दैवानें खोल तळाशीं गेली. या कवितेंत थोर कवींच्या काव्याचें सुंदर विडंबन केलें आहे.

आर्या

**बहु लाजवीत होतों–करि, केसरि, कीर, केकि, हरिणा मी**
**हांसत कर्म करावें, भोगावें रडत तेंचि परिणामीं**

मोरोपंत

राम सीतावियोगानंतर म्हणतो–सीतेच्या सौंदर्यामुळें मी हत्ती, सिंह, पोपट, मोर व हरिण यांच्या सौंदर्याकडे तुच्छतेनें पाहात होतों. पण आतां? हे प्राणी दिसल्याबरोबर मला सीतेच्या

सौंदर्याची आठवण होऊन मी दुःखी होतों. मनुष्य प्रथम एखादें काम हंसत हंसत करतो पण शेवटीं त्याला दुःखानें रडत त्याचे परिणाम भोगावे लागतात.

द्रुतविलंबित

**भरंवसा न धरी घडिचा पहा**
**कठिण मृत्यु गळ्यावरि चाप हा;**
**म्हणुनि शीघ्र उठे करि तांतडीं**
**फुकट तूं दवडी न कधीं घडी.**

कृ. ना. आठल्ये

एका घडीचाहि भरंवसा धरूं नकोस. कारण कठोर अशा मरणाचा चाप तुझ्या गळ्यावर सतत आहे. म्हणून लवकर सावध हो, घाई कर. तूं आपल्या आयुष्याचा अल्प काळहि फुकट दवडूं नकोस.

उपेंद्रवज्रा

**मनोज्ञ पुष्पासम गंधवंत**
**पवित्र तान्यापरि दीप्तिमंत**
**सुरम्य मोत्यापरि पाणिदार**
**प्रभो कधीं अर्पिन कर्महार.**

साने गुरुजी

सुंदर फुलाप्रमाणें सुगंधी, पवित्र तान्याप्रमाणें तेजस्वी, तजेलदार मोत्याप्रमाणें पाणीदार, असा कर्तव्याचा हार, हे देवा मला कधीं बरें अर्पण करतां येईल?

साकी

**यशोदेस त्या नंदन झाला, नंदाला आनंद.**
**मला आवडे त्या नंदाचा सदानंद गोविंद.**

कवि गोविंद

यशोदेला मुलगा झाला म्हणून नंदाला आनंद झाला. मला नंदाचा सदा आनंदी व खेळकर असणारा गोविंद फार आवडतो.

चद्रकात

**रक्त कपाळीं दिला रक्ततर कुंकुमतिलक बरा**
**अरुण पटावर मांगल्याचा नव मंगल तारा !**

गोविंदाग्रज

कवि राम गणेश गडकरी ७-८ वर्षांच्या 'चिमुकल्या मुली'ला पाहून तिचें वर्णन करतांना म्हणतात:—

तिच्या गुलाबी वर्णाच्या कपाळावर तांवड्या लाल कुंकवाची सुंदर टिकली रेखली होती. जणूं अरुणोदयाच्या वेळीं आरक्त झालेल्या आकाशाच्या विभागावर मंगल ताराच शोभत होता.

इंद्रवज्रा

**लज्जा न, संकोच नसे न भीति**
**हो दग्ध तें स्त्रीपण संगरांत**
**आतां उरें जीवनसूत्र एक**
**गुंतून राहे मन मात्र त्यांत !**

कुसुमाग्रज

कवि विष्णु वामन शिरवाडकर यांनीं 'फाळणीच्या वेळीं निदान मुलांचा जीव तरी वांचावा, म्हणून एका स्त्रीनें आपल्या लहानग्याला विमानांत फेकलें'. या घटनेवर ही 'निरोप' कविता केली आहे. 'मोठ्या राष्ट्रीय संकटांत त्या स्त्रीला विनय, संकोच किंवा भीति हे गुण उरलेच नाहींत. कारण तिचें स्त्रीत्व त्या भीषण आपत्तींत जळून खाक झालें होतें. आतां त्या चिमुकल्या

वाळाच्या रूपानें तिच्या आयुष्याची दोरी शाबूत होती. त्या मुलाच्या सुरक्षितपणांत तिचें मन गुंतलें होतें.

हरिभगिनी

**वरतीं बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे**
**मंगल तोरण काय बांधिलें, नभोमंडपीं कुणि भासे !**

बालकवि ठोमरे

आकाशांत बघाल तर इंद्रधनुष्याचा जणूं दुहेरी गोफ विणला आहे असें वाटेल. नभाच्या मंडपाला हें मंगल तोरणच कुणीं बांधलें आहे कीं काय असा भास होतो.

शिखरिणी

**शरत्कालीं शस्त्रें स्मर विधु-सुहृद् घे निजकरीं**
**सुगंधी पुष्पांचें नवधनु तदा चित्रित धरी;**
**प्रगुंजन्मत्तालि ध्वनिच जणु मौर्वी-रव करी,**
**सुदृक्-दृक-बाणांतें हणुनि विरहि प्राणच हरी !**

पांडुरंगशास्त्री पारखी

शरदऋतूमध्यें चद्रांचा मित्र मदन आपल्या हातांत शस्त्रें धारण करतो. सुगंधी पुष्पांचें चित्रविचित्र नवीन धनुष्य तो हातीं घेतो. गूं गूं करीत फिरणाऱ्या मत्त झालेल्या भुंग्याच्या आवाजाच्या रूपानें आपल्या धनुष्याच्या दोरीचा टणत्कारच तो करीत असतो. सुंदर नेत्रांच्या स्त्रीचे कटाक्षरूपी बाण मारून तो विरही-लोकांचे प्राण हरण करतो.

आर्या

**षड्रिपुमाजीं भूपा! जाणे बा अग्रगण्य काम खरा**
**तत्पर होतो नर जो, अणुमात्रहि तो उणा असे न खरा!**

सर टी. माधवराव

हे राजा! सहा शत्रूंमध्यें कामरिपु हा सर्वांत श्रेष्ठ होय. त्याच्या नादीं जो मनुष्य लागतो तो गाढवापेक्षां कोणत्याहि प्रकारें कमी नसतो.

अनुष्टुभ

**सगळे धर्म सोडून एका शरण ये मज**
**जाळीन सर्व मी पापें तुझीं शोक करूं नको**

विनोबा भावे

सगळीं कर्तव्यकर्में सोडून तूं मलाच शरण ये. मी तुझ्या सर्व पापांना जाळून भस्म करीन. तूं दुःख करूं नको.

चंद्रकांत

**हळु मळा झुळझुळे सळसळत्या भातानें**
**जणुं झराच अवखळ, [ जल-लहरीनें!**
**चहुंकडे हांसतो चिमण हिरवा**
**कुणि म्हणोत इरलीं; इवल्या नावा!**

वि. स. खांडेकर

भाताचा मळा वायुलहरी ‿ ऽसळ आवाज करीत डोलत होता. जणूं एखादा अल्लड व उच्छृंखळ झराच पाण्याच्या लाटांनीं झुळझुळ वाहात आहे असें वाटत होतें. चारी दिशांना हिरवागार असा छोटा समुद्रच पसरला होता. त्यांत इरलीं घेतलेले कामकरी

फिरत होते. मला तर त्या चिमुकल्या नावाच फिरत आहेत, असा भास होत होता.

आर्या

**'ळ' हें शेवटीं ज्याच्या 'म' मध्यें 'क' तसाच पहिल्यानें**
**पंकांत जन्म पावुनि, हरि-करिं चढतें परंतु सुगुणानें!**

वि. वि. भागवत

'ळ' हें अक्षर ज्या शब्दाच्या शेवटीं आहे, 'म' मधलें व 'क' पहिलें आहे असें कमळ चिखलांत जन्म असूनहि आपल्या सौंदर्य सुगंधादि गुणांमुळें श्रीविष्णूच्या हातांत जाण्याइतकी आपली उन्नति करूं शकतें.

पृथ्वी

**क्षणोक्षणिं पडे, उठे, परि बळें उडे बापडी**
**चुके पथहि येउनी, स्तिमित दृष्टिला झांपडी;**
**किती घळघळां गळें रुधिर कोमलांगांतुनी**
**तशीच निजकोटरा परत पातली पक्षिणी**

ना. वा. टिळक

ती बाणानें घायाळ झालेली पक्षिणी क्षणोक्षणीं पडत होती. पुन्हा उठत होती. जोर करून बिचारी उडत होती. तिच्या अशक्त-पणामुळें तिच्या डोळ्यांना अंधारी येऊन ती वाट चुकत होती. तिच्या नाजुक शरीरांतून रक्त घळघळां वाहात होतें. तशीच ती पक्षिणी आपल्या घरट्यांत परत आली.

'ज्ञ' हें शेवटिं. ज्याच्या पहिलीं दो अक्षरें पहा 'सर्व'
'सर्वज्ञ' ईश केवल, मनुजें वाहूं नये वृथा गर्व !

वि. वि. भागवत

ज्ञ हें अक्षर ज्या शद्बाच्या शेवटीं आहे व पहिलीं दोन अक्षरें सर्व हीं आहेत, असा सर्वज्ञ केवळ परमेश्वरच आहे. म्हणून मनुष्यानें विनाकारण गर्व करूं नये.



# अक्षर बापूजी

## प्रास्ताविक

म. गांधींचें जीवन, तत्त्वज्ञान व सार्वजनिक कार्य खालील कवितांतून अनुष्टुभ वृत्तांत गुंफण्याचा प्रयत्न केला आहे. या सुभाषितांत बापूजींच्या अक्षर जीवनदृष्टीचें स्थूलमानानें दर्शन होईल. प्रत्येक सुभाषित स्वतंत्र आहे. वाचकांना या कविता आवडतील अशी आशा वाटते.

'भेंडचा' या पुस्तिकेबरोबरच हें काव्य दिल्यानें त्या खेळाला यांतील कविता पूरक व्हाव्यात हाहि माझा एक उद्देश साध्य होईल.

वि. वि. भागवत

अनुष्टुभ

'अहिंसा' सत्य हें 'सत्याश्रित' तत्त्व असें भलें ।
अकरा व्रत-रत्नांत कोहिनूरचि शोभलें ।।

आई मोहनदासांची श्रीगीताच गमे मला ।
'अनासक्ति'मया दुग्धा देउनी पोशिलें मुला ।।

इयत्ता पुरुषार्थाची 'सत्याग्रहिं' समावली ।
शांतीच्या कोंदणामध्यें शूरता दिव्य शोभली ।।

ईश तो जनतासेवेमधीं सर्वत्र लाभतो ।
सत्तेच्या धांवणें मागें, त्यामधें काय लाभ तो ? ।

☆ ☆ ☆ ☆ ☆

उदात्त ध्येय बापूंचें उंच जें हिमनगासम ।
मानवा देतसे श्रद्धा, त्याग, प्रेम तसा शम ।।

ऊंस संतापरी देतो चरकीं नित्य देह तो ।
जना सुरस लाभाया; बापूंचा तेंवि होम तो ।।

'एकेक क्षण हा माझा गहाण पडला असे'।
ईश्वराच्या करांतून सत्कर्म सोडवीतसे! ।।

ऐकणें, बोलणें सत्य, सद्हेतूनेंच पाहणें ।
संदेश माकडें देतीं असत्यास न साहणें! ।।

ओढाळ मन हें भारी, कर्ण, जीभहि, नेत्र ते ।
आवरावें सदा सूज्ञें, नरत्वा हेंच शोभतें ।।

औट घटिचा असे जन्म, 'वानरां'तील 'वा' टळो ।
'नदी ही 'नर'जन्माची 'नारायण' पदा मिळो ।।

अंबरांत जसा सूर्य तेजें दशदिशा भरी ।
सत्याचा शोध बापूंचा विश्वाची अंधता हरी ।।

कमलाच्या सुगंधानें, मधानें, भुलतो अली ।
बापूंच्या मुक्त हास्यानें मुग्ध मानव भूतलीं ।।

खगांत वैनतेयाची भरारी श्रेष्ठ ती अहा ।
प्रभावी सर्व शस्त्रांत 'सत्याग्रह' ठरे महा ।।

गगनीं एकला उंच उडसी गरुडा जसा, ।
नोआखलींत 'शांतीचा दूत' निर्भय तूं तसा ।।

घड्याळें शोभती हातीं, कालभान नसे परी ।
मात कालावरी केली, तपस्येनें तुवां परी ।।

चष्मा नवा अहिंसेचा जगाच्या नयनावरी ।
ठेवूनि दिधली दृष्टि खरी ही तव चातुरी ।।

छद्मी भाषण ही हिंसा भेदिते पर अंतर ।
द्वेष-वृद्धि सदा होय शब्दशस्त्रें भयंकर ।।

☆ ☆ ☆ ☆ ☆

जन्म मानव हा धन्य, वाणी येथ विशेषता ।
हातीं काम, मुखीं नाम, संतसंगें कृतार्थता ।।

झंकार करिती झांजा, नाम-घोष जनीं उठे ।
बापूसम महाभक्ता जगीं भय असें कुठें ।। ?

टणत्कार धनूचा हो, रात्रिचर जवें वनीं ।
पळती, षड्रिपू तैसे बापूंच्या शुद्ध जीवनीं ।।

ठकवी कवि ना, नेतो नंदनीं मोद घ्यावया ।
प्रेम-पीयूष दे विश्वा, बापू, ही विभुची दया ! ।।

डर त्या मृत्युचें कैचें, आध्यात्मिक सुखा वरी, ।
बापूसम स्थितप्रज्ञा, तृप्त जो नित्य अंतरीं ! ।।

ढगांची श्याम बापूंना पदवी शोभते अती ।
जलक्षार पिऊनी जे, धारा गोडचि वर्षती ।।

तत्त्वनिष्ठ महात्माजी, कटु टीका गिळूनियां ।
रसाळ, मितसाहित्य लिहुनी मिळवी जया ।।

थके ना फेडितां शंका, विश्वाचे कूट प्रश्न जे ।
कौशल्यें जो अहिंसेच्या मार्गें सोडविण्या धजे ।।

'दगडापरि लाभावी मला ती निर्विकारता ।
शताब्दांहि वरी आयू लाभे क्रोधास जिंकतां' ! ।।

धनास या जगीं मान, परी मोह न मोहना ।
सत्यशोधन ध्येयाची चालवी नित्य साधना ।।

नटे ही विविधा सृष्टी प्रेमानें; प्राणतत्त्व तें—।
जगताच्या विकासाचें ; सत्य सांगति संत ते ! ।।

पटे जें 'सत्य' तैसें तो निश्चयें करि वर्तन ।
हरिश्चंद्र-कथा दे ज्या शैशवीं नव-दर्शन !

फणसापरि बाहेरी कांटे; गोड मधें गरे ।
मुद्रा कठोर बापूंची, अंतरीं प्रीति पाझरे ! ।।

अनुक्रम 38003
वि. वा.
3022
नों. दि. 10/12/62

ठाणे. वाचन

भेंडया

बहू अंतर शौर्यांत संत-सेनानिच्या असे ।
बापू निर्भय सर्वत्र, शौर्य तें संगरीं दिसे ।।

भगवंत असे कोठें ? ' सत्य ' हें रूप साजिरें ।
' सत्य ' हाच सदा देव, सेवावा नित्य आदरें ।।

मर्म हिंसाअहिंसेचें, शर्म तें कोणतें असें ? ।
अहिंसेसह भीरुत्व त्याज्य तें सर्वदा दिसें ।।

यमाची भीति ना त्यांना, थोर सत्याग्रही खरे ।
प्रेमपूर्ण, अनासक्त, भजती ' सत्य ' साजिरें ! ।।

रणांतहि दिसे ज्यांची निर्मलावृत्ति, लीनता ।
प्रेमपूर्ण अनासक्ति, सत्याची तेथ सांगता ! ।।

लढाईच्या महालाटा उंच काल-सरोवरीं ।
दिसती, परि त्या कैंची जीवनाची बरोबरी ? ।।

वर्ण-विद्रोह-वन्हींत वांचला विश्वसंत हा ।
मारेकरीच हो मित्र, श्रद्धेची किमया महा ! ।।

शर्म ' सत्य ' असें नित्य श्रद्धा प्रेरक जीवनीं ।
ज्योति तूं उज्ज्वला केली, काजळी नित्य झाडुनी ! ।

षड्यंत्रें, गुप्त संस्थांनीं, स्वातंत्र्याची उषःप्रभा ।
या युगीं ये न; मार्गा त्या अहिंसा दाखवी शुभा ।।

सचेत जन तूं केलें " सर्वत्र भयवर्जना– ।
करा ! " अशी दिली दीक्षा; घुमे देशांत गर्जना ।।

हवी अस्तेय, अस्वाद व्रतांची ती उपासना ।
समाजांत म्हणोनी तूं आश्रमीं बोधिलें जना ।।

क्षमावान क्षमेहूनी झालासी मृत्युच्या क्षणा ।
' हे राम ' ! धन्य ही होती तुझी अंतिम घोषणा ।।

ज्ञप्ति विश्वात्मदेवाची जाहली तुज, ईश्वर– ।
तृप्त झाला; तुझी राहे अनंतीं स्मृति अक्षर ।।

---

अ
बालवाङ्

गोष्टी कोणाला आवडत नाहींत? आणि त्यांतहि त्या गोष्टी जर पशुपक्ष्यांच्या असल्या तर मग विचारायलाच नको! लहान मुलेंच काय, पण मोठीं माणसेंहि त्या वाचण्यांत अगदीं रंगून जातात. म्हणूनच आम्ही अशा गोष्टींची ही माला प्रकाशित करीत आहोंत. हीं त्यांतील कांहीं पुस्तकें पहा.

| | मूल्य रु. |
|---|---|
| ★ कावळोबांच्या जमती : सौ. सुमती पायगांवकर | ०·९० |
| ★ उंदिरमामांची कहाणी : श्री. शं. रा. देवळे | ०·७५ |
| ★ ससेभाऊंच्या गमती जमती : श्री. रं. म. जोशी | ०·५० |
| ★ गाढवभाऊंच्या गमती जमती : श्री. शं. रा. देवळे | ०·६० |
| ★ माकडभाऊंच्या गमती जमती : श्री. ल. रा. गोडबोले | ०·६० |
| ★ आपण सारे एक : सौ. नलिनी देवळे | ०·७५ |
| ★ भारताच्या इतिहासांतील मनोरंजक कथा : श्री. त्र्यं. ग. बापट | ०·५० |
| ★ बालरंजन (शिशुगीतें) : श्री. ताराबाई परांजपे | १·७५ |
| ★ थोरांच्या नवलकथा : श्री. शं. रा. देवळे | ०·७५ |
| ★ इतिहासांतील नवलकथा : श्री. म. वि. सोवनी | ०·७५ |
| ★ नामदेवाची दिवाळी : श्री. शं. रा. देवळे | ०·३७ |
| ★ वन्यपशूंच्या मौजा : श्री. वि. वा. जोशी | ०·५० |
| ★ महर्षि कर्वे चरित्र : श्री. महाबळेश्वरकर | ०·५० |

आणखी कितीतरी पुस्तकें निघणार आहेत.

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २.